मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 1 जुलै 2024 | पान- 1


# पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीत राजकीय भूकंप

## शहराध्यक्ष अजित गव्हाणेंसह 16 माजी नगरसेवक प्रवेश करणार : शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या उपस्थितीमध्ये निर्णायक बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. पिंपरी चिंचवड हा अजित पवारांचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र आता याच बालेकिल्ल्याला शरद पवार सुरुंग लावण्याच्या तयारीत आहेत. पिंपरी चिंचवडच्या राष्ट्रवादीच्या शहराध्यक्ष अजित गव्हाणेंसह 16 नगरसेवकांनी काल मोदी बागेत शरद पवारांची भेट घेतली आहे. तर अजित पवार गटातील भोसरीचे माजी आमदार विलास लांडे हे शरद पवारांची भेट घेण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या उपस्थितीमध्ये निर्णायक बैठक झाली असून, येत्या ५ जुलैरोजी पक्षप्रवेशाचा मुहूर्त ठरला आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह 16 नगरसेवकांनी मोदीबागेत शरद पवाराची भेट घेतली. त्यावेळी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे आणि माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत धर यांच्यासह प्रदेश उपाध्यक्ष व पिंपरी-चिंचवड निरीक्षक प्रकाश म्हस्के उपस्थित होते.



> राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील अनेक नगरसेवकांनी आज पवार साहेबांची भेट घेतली आहे. मात्र त्यांचा अद्याप प्रवेश झाला नाही. तसेच अनेक भाजपचे नगरसेवक देखील शरद पवार गटात प्रवेश करण्यात इच्छुक आहेत. लवकरच हे प्रवेश देखील होतील.
>
> - तुषार कामटे शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट.

### भोसरी विधानसभेत 'तुतारी' निश्चित...

» दरम्यान, अजित पवार गटातील भोसरीचे माजी आमदार विलास लांडे आज शरद पवारांची भेट घेण्याची शक्यता आहे. कारण, अजित गव्हाणे यांच्यासोबत विलास लांडे यांचा मुलगा माजी नगरसेवक विक्रांत लांडे बैठकीला उपस्थित होते. तसेच, लांडेंच्या सोबत अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे आणि माजी नगरसेवकांसह 15 पदाधिकारी ही शरद पवारांच्या तालमीत परतण्याचे निश्चित झाले आहे. लोकसभेत शरद पवारांचा चाललेला करिश्मा पाहून विलास लांडे घरवापसी करण्याच्या तयारीत आहेत. मात्र भोसरी विधानसभा विलास लांडे आणि त्यांचे नातेवाईक अजित गव्हाणे ही लढण्यास तीव्र इच्छुक आहेत. परंतु, महाविकास आघाडीमध्ये या जागेवर शिवसेना ठाकरे गटाने दावा केला आहे. परंतु, लांडे आणि गव्हाणे यांचा शरद पवार गटातील संभाव्य प्रवेश पाहाता ही जागा 'तुतारी'वर लढण्याचे निश्चित झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे ठाकरे गटाचे तीव्र इच्छुक सुलभा उबाळे आणि धनंजय आल्हाट यांची भूमिका काय? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

लोकसभा निवडणूक संपल्यानंतर आता समस्त महाराष्ट्राला विधानसभा निवडणुकचे वेध लागले आहे. राजकीय पक्षांनीदेखील या निवडणुकीच्या अनुषंगाने आपली तयारी चालू केली आहे. दुसरीकडे नेतेमंडळींना आपल्या मतदारसंघात लोकांशी गाठीभेटी वाढवल्या आहेत. तर काही नेते तिकीट मिळवण्यासाठी वरिष्ठांची मनधरणी करण्याच्या प्रयत्नात आहेत. काही नेते आपली राजकीय सोय बघून पक्षबदल करण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. राजकीय घडामोडींनीही वेग आला आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मोठे खिंडार पडणार आहे.

# पिंपरी चिंचवडकरांनी अनुभवला व्हीएमडीवरून लाईव्ह पालखी सोहळा

## स्मार्ट सिटीचा उपक्रम; भाविकांनी घेतले आपापल्या भागातून पालखी सोहळयाचे दर्शन

**पिंपरी | प्रतिनिधी**

विठू नामाचा गजर, ज्ञानोबा माऊली तुकाराम... असा जयघोष करत आषाढीवारी पंढरपूरच्या दिशेने निघालेला जगदगुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळयाने आज सायंकाळी पिंपरी चिंचवड येथे प्रवेश केला. या भक्तीमय पालखी सोहळयाचे शहरातील भाविक भक्तांना प्रत्यक्ष दर्शन होण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी आणि रविवारी दोन दिवस व्हीएमडी स्क्रीनवर थेट लाईव्ह प्रेक्षपण करण्यात आले. शहरातील नागरिकांनी हेची देह... हेची डोळा... जगदगुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा अनुभवला. चौकाचौकातून केलेल्या सोहळयाच्या लाईव्ळ प्रेक्षपणाद्वारे पंचक्रोशीतील अबालवृध्दांनी या पालखी सोहळयाचे दर्शन घेतले. या उपक्रमाचे शहरातील नागरिकांनी कौतुक करत महापालिकेचे आभार मानले.

महानगरपालिका व स्मार्ट सिटी यांच्यावतीने सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण यांच्या नेतृत्वात हा उपक्रम राबविण्यात आला. जगदगुरु श्री संत तुकाराम महाराजांची कर्मभूमि असलेल्या देहूनगरीतील इनामदार वाडयातील पहिला मुक्काम संपवून शासकीय महापूजेनंतर तुकोबांचा पालखी सोहळा हा वैष्णवांचा मेळा हरिनामाचा गजर करीत शनिवारी आकुर्डीकडे रवाना झाला. सायंकाळी निगडी येथे राज्यभरातून या वारीत सहभागी झालेल्या भाविक भक्तांचे महापालिकेच्या वतीने मोठया जल्लोषात स्वागत करण्यात आले. यंदाच्या पालखी सोहळयाचे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दर्शन घेत पालखी सोहळयातील भाविकांना वारीसाठी शुभेच्छा दिल्या.



> महिला, आबालवृद्धांनी गर्दीच्या ठिकाणी न जाता पालखी सोहळयाचे लाईव्ह दर्शन घडावे, तसेच पालखी सोहळयाच्या ठिकाणी गर्दीचे प्रमाण कमी होण्याच्या उद्देशाने महापालिकेतर्फे प्रथम हा उपक्रम राबविण्यात आला. फेसबुक लाईव्ह, युटूयब लाईव्ह आणि व्हीएमडी स्क्रीन वरील पालखी सोहळयाच्या लाईव्ह प्रेक्षपणाच्या या यशस्वी उपक्रमाद्वारे शहरातील लाखो नागरिक, प्रवासी, अबालवृध्द भाविकांनी दर्शनाचा लाभ घेता आला.
>
> - शेखर सिंह, आयुक्त- पिंपरी चिंचवड महापालिका

# संत ज्ञानेश्वरांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## पालखी सोहळा डोळ्यांमध्ये साठवून ठेवतानाच वारकऱ्यांचे पाय जणू पंढरपूरच्या ओढी लागले

**पुणे | प्रतिनिधी**

पंढरीची वारी । आनंद सोहळा
पुण्य उभे राहो आता । संताच्या या कारणे ।।
पंढरीच्या लागा वाटे । सखा भेटे विठ्ठल ।।

या अभंगाप्रमाणे प्रत्येक वारकऱ्याला जणू पंढरीच्या विठूरायाच्या दर्शनाची आस लागलेली आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा डोळ्यांमध्ये साठवून ठेवतानाच वारकऱ्यांचे पाय जणू पंढरपूरच्या ओढी लागले आहेत. अशा या भक्तीमय वातावरणात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे शनिवारी (२९ जून) अलंकापुरीतून प्रस्थान झाले. टाळ, मृदंगाच्या गजरात 'ज्ञानोबा माउली ज्ञानराज तुकाराम'च्या जयघोषात लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने माउलींच्या पालखीचे प्रस्थान झाले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी पायीवारी प्रस्थान सोहळ्यास पहाटे चारला घंटानादाने सुरुवात झाली. सकाळी देऊळवाड्यात सोहळा सुरू झाला. प्रस्थान सोहळादिनी आळंदीत दिवसभर माउली नामाचा गजर सुरू होता. अलंकापुरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. लाखो भाविक आळंदीत माउलींच्या प्रस्थान सोहळ्यासाठी दाखल झाले होते. भक्तीच्या या वैभवी सोहळ्यात लाखो वैष्णवांनी माउलींच्या समाधीचे दर्शन घेत प्रत्यक्ष स्वतःच्या नयनांनी हा उभा सोहळा अनुभवला.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढी पायीवारी सोहळा शनिवारी (दि. २९) आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान केले. देहभान विसरून 'ग्यानबा तुकाराम'चा जयघोष करीत पंढरीकडे जाण्यासाठी लाखो वारकरी ज्ञानियांच्या अलंकापुरीत दाखल झाल्याने प्रस्थान सोहळ्यासाठी जणू भक्ती सागरच लोटला होता. आषाढाची चाहूल लागताच वारकऱ्यांना पंढरीच्या वारीची ओढ लागते.



### पोलिसांचा तगडा बंदोबस्त...

» संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी होणाऱ्या गर्दीचा अंदाज घेऊन पिंपरी–चिंचवड पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला आहे. शेकडो पोलीस रस्त्यावर थांबून सुरक्षिततेची काळजी घेत आहेत. पालखी सोहळ्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिसांनी साध्या वेशातील पोलीस, वॉचर यांचीही नेमणूक केलेली आहे. प्रस्थान सोहळा नंतर माउलींची पालखी आळंदीतून आजोळघरी मुक्कामी राहते. त्यामुळे माउलींचे मंदिर, मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, इंद्रायणी नदीचे दोन्ही घाट तसेच संपूर्ण आळंदी शहरातच पोलिसांकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे.

### माउलींची महापूजा...

» संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या आषाढी पायीवारी प्रस्थानप्रसंगी पवमान अभिषेक, ११ ब्रम्हवृन्दांचा वेदघोष, समाधीवर माउलींच्या मुखवट्याला दूध, मध व दह्याचा अभिषेक करण्यात आला. नंतर गरम पाण्याने ‘श्रीं’ना स्नान घालण्यात आले. सुवासिक चंदन, अत्तर लावून माउलींची सर्वांगसुंदर पूजा बांधून मुखवट्यावर पोशाख परिधान करण्यात आला. या विधिवत पूजासमयी माउलींचे ‘साजिरे’ रूप आकर्षक दिसून येत होते.

### महाद्वारातून वारकरी, भाविकांना प्रवेश बंद

» वाढती गर्दी लक्षात घेऊन शुक्रवारपासून (दि. २८) महाद्वारातून वारकरी तसेच भाविकांना प्रवेश बंद केला होता. प्रस्थान सोहळ्याच्या पूर्वसंध्येला टेम्पो, ट्रकमधून वारकरी भाविकांचे आगमन झाले, तर काही वारकरी पायी चालत आळंदीत दाखल झाले आहेत. भाविकांच्या आगमनाने इंद्रायणी नदीतीर गजबजून निघाला आहे. इंद्रायणी तीरावर वासुदेवाच्या हरिनामाचा गजर ऐकू येत आहे. तर काही भाविक वारीची आठवण जतन करण्यासाठी इंद्रायणी नदीकाठावर आपल्या कुटुंबीयांसमवेत मोबाईलमध्ये छायाचित्रण करत असताना दिसून येत होते.

# लोणावळ्यात एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेले!

## भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या जंगलातील वॉटर फॉलमध्ये पर्यटक हे थेट भुशी धरणात वाहून गेले

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. लोणावळ्यातील भुशी डॅम परिसरात पर्यटनासाठी आलेले 5 जण वाहून गेले आहेत. धक्कादायक म्हणजे वाहून गेलेले 5 जण एकाच कुटुंबातील होते. भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या डोंगरातील वॉटर फॉल येथून हे कुटुंब वाहून गेले.

लोणावळ्यात वर्षाविहारासाठी गेलेले पाच जण भुशी धरणात वाहून गेले आहेत. भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या जंगलातील वॉटर फॉलमध्ये पर्यटक हे थेट भुशी धरणात वाहून गेले. यात लहान मुले, महिलांचा समावेश आहे. त्यांचं शोधकार्य सुरू आहे. अन्सारी कुटुंब असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

लोणावळ्यात वर्षाविहासाठी गेलेले पाच जण वाहून गेले आहेत. अन्सारी हे कुटुंब भुशी धरणाच्या वर असलेल्या जंगलात वॉटर फॉल (बॅक वॉटर) येथे वर्षाविहाराचा आनंद घेत होते. तेव्हा, पाच जण या वॉटर फॉलमधून भुशी धरणात वाहून गेल्याचे लोणावळा पोलिसांनी माहिती दिली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक लोणावळ्यात दाखल होत आहेत. भुशी धरण देखील ओव्हरफ्लो झालं असून पर्यटकांची गर्दी होत आहे.



### भुशी धरण ओव्हरफ्लो

» पर्यटकांची पंढरी समजल्या जाणाऱ्या लोणावळ्यातील भुशी धरण सध्या ओव्हरफ्लो झाले आहे. लोणावळा परिसरात शुक्रवार, शनिवारी झालेल्या जोरदार पावसाच्या सरी आणि आज रविवारी सकाळपासून झालेला पाऊसयामुळे भुशी धरण ओसंडून वाहू लागले आहे.

### काय घडले नेमके?

» भुशी धरणाच्या पाठीमागे असलेल्या डोंगरातील धबधब्याला रेल्वेचा वॉटर फॉल म्हणून ओळखलं जातं.अन्सारी कुटुंब रविवारी परिवारासोबत वर्षाविहारासाठी या परिसरात आले होते. हे सर्वजण पाण्याच्या प्रवाहात भिजण्याचा आनंद घेण्यासाठी गेले मात्र पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने दुर्दैवाने हे सगळेजण वाहून गेले. वाहून गेलेल्यांमध्ये लहान मुलांचा आणि महिलांचादेखील समावेश आहे.

# तुझी सेवा करीन मी मनोभावें वो। माझें मन गोविंदीं रंगलें वो।।

## पालखीच्या दर्शनासाठी एकच गर्दी उसळली. भाविकांनी हात उंचावून व टाळ्या वाजवून पालखीचे स्वागत केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

तुझी सेवा करीन मी मनोभावें वो । माझें मन गोविंदीं रंगलें वो ॥१॥
नवसिये नवसिये माझे नवसीयेवो ॥ पंढरिचे दैवते विठ्ठले नवसिये वो ॥२॥
बापरखुमादेवीवरे विठ्ठले वो । चित्तीं चैतन्य चोरुनि नेलें वो ॥३॥

या अभंगाप्रमाणे पांडुरंगाच्या भेटीची आस मनी ठेवतच हजारो वैष्णवांच्या मेळ्याचे माउलींच्या पालखी सोहळ्यासमवेत गुरुवारी दिघीतील मॅगझीन चौकात आगमन झाले. तेव्हा, पालखीच्या दर्शनासाठी एकच गर्दी उसळली. भाविकांनी हात उंचावून व टाळ्या वाजवून पालखीचे स्वागत केले. काही काळानंतर हा चैतन्यरूपी सोहळा पुण्याच्या दिशेने मार्गस्थ झाला.

वडमुखवाडीतील श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिरात माउलींच्या पादुका पालखी सोहळा मालक राजेंद्र आरफळकर यांनी प्रथा परंपरांचे पालन करत आणल्या. त्यावेळी माउलींच्या पादुकांची महापूजा, दही, दुधाचा व मधाचा अभिषेक आणि आरती करण्यात आली. हार, तुळशीहार, श्रीफळ अर्पण करण्यात आले. तसेच पुरणपोळीचा महानैवेद्य व पेढे प्रसाद वाढविण्यात आला. श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर, सुनीता तापकीर यांनी श्रींची पूजा केली. त्यानंतर, माऊलींची आरती करण्यात आली.

विठू नामाचा गजर आणि ज्ञानोबा - तुकाराम जयघोष करत आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे निघालेला जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा दोन दिवस उद्योगनगरीत होता. या सोहळ्याचे महापालिका व स्मार्ट सिटीने शनिवार आणि रविवारी शहरातील ठिकठिकाणच्या व्हीएमडी स्क्रीनवर थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्याद्वारे शहरातील भाविकांना पालखीचे दर्शन घेता आले. फेसबुक लाईव्ह, युट्यूब लाईव्ह आणि व्हीएमडी स्क्रीनवर सोहळ्याचे थेट प्रक्षेपण दाखविले. भक्ती-शक्ती चौक निगडी, चिंचवड स्टेशन, पिंपरी चौक, निगडी प्राधिकरण, रावेत, चापेकर चौक, चिंचवडगाव, काळेवाडी, पिंपरीगाव, वाकड, डांगे चौक, किवळे, पिंपळे सौदागर, रहाटणी, थेरगाव, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, रक्षक चौक, दापोडी, भोसरी, दिघी, चिखली, शाहूनगर, मोशी, तळवडे आयटी पार्क आदी ६० ठिकाणी थेट प्रक्षेपण केले. त्याद्वारे भाविकांना घराजवळूनच थेट सोहळा पाहता आला.



### आयुक्त शेखर सिंह, आमदार महेश लांडगे यांच्याकडून सारथ्य

» थोरल्या पादुका मंदिरातून पालखीचे सकाळी सव्वा अकरा वाजता मॅगझीन चौकात आगमन झाले. या ठिकाणी आमदार महेश लांडगे व पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी पालखी रथाचे स्वागत व सारथ्य केले. पिंपरी-चिंचवड महापालिकेने उभारलेल्या स्वागत कक्षात दिंडी प्रमुखांचा खासदार श्रीरंग बारणे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजय खोराटे, उल्हास जगताप, सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते प्रथमोपचार संच, श्रीफळ, हार देऊन सत्कार करण्यात आला. उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, रविकिरण घोडके, शहर अभियंता मकरंद निकम, सहशहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, मुकेश कोळप आदींनीही दिंडी प्रमुखांना सन्मानित केले. मॅगझीन चौकात भोसरी, दिघी, इंद्रायणीनगर आदी परिसरातील भाविकांनी माउलींच्या पालखीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. रिमझिम पावसात भाविक माउली, माउलीचा जयघोष करत होते. मॅगझीन चौकात पालखी आल्यावर दर्शनासाठी एकच गर्दी उसळली. पालखीच्या आगमनानंतर भाविकांचे देहभान हरपले होते. दुपारी सव्वाएकच्या सुमारास पालखी सोहळा दिघीतील जुना जकात नाक्यावरून पुण्याकडे मार्गस्थ झाला.

### 'हरित वारी, निर्मल वारी' दिंडी

» महापालिकेच्या आरोग्य विभागाची 'हरित वारी निर्मल वारी' दिंडी वारीत सहभागी झाली होती. त्याद्वारे नागरिकांत प्लॅस्टिक कचरा आणि वृक्षारोपणाविषयी जनजागृती करण्यात आली. दिंडीत महापुरुष आणि संतांच्या वेशभूषेत सहभागी झालेले दिंडीकरी लक्ष वेधत होते. त्याचप्रमाणे वासुदेवाच्या वेशभूषेतही मोठ्या प्रमाणात लोक कलाकार सहभागी झाली होते.

### रांगोळी, फुलांच्या पायघड्या

» सोहळ्याच्या स्वागतासाठी रांगोळीच्या व फुलांच्या पायघड्या घालण्यात आल्या. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथ, विश्वस्त भावार्थ देखणे, खासदार श्रीरंग बारणे, व्यवस्थापक माऊली वीर, माजी महापौर नितीन काळजे, माजी नगरसेविका निर्मला गायकवाड, माजी सभापती अरुण चौधरी, चोपदार रामभाऊ रंधवे, राजाभाऊ रंधवे आदींचा यावेळी सत्कार करण्यात केला. यावेळी हिरामण बुर्डे, मनोहर भोसले, रमेश महाराज घोंगडे, साहेबराव काशीद, राजेंद्र नाणेकर आदी उपस्थित होते. रोहिणी परुतगल्ले यांच्या रांगोळीच्या पायघड्यांनी भाविकांचे लक्ष वेधले.

# इंद्रायणी नदीवरील पर्यायी रस्ता पाण्याखाली

## सध्या लोणावळा परिसरात पाऊस सुरू असून इंद्रायणी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

कार्ला पुलाचे काम सुरू असल्याने नागरिकांच्या सोयीसाठी तयार करण्यात आलेला पर्यायी रस्ता पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे, खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांकडून हा रस्ता रहदारीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. मात्र, त्याने कार्ला, मळवली, देवळे, भाजे, लोहगड, बोरज, पाटण, औंढे भागांतील नागरिकांना मोठा वळसा पडणार आहे.

सध्या लोणावळा परिसरात पाऊस सुरू असून इंद्रायणी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे, कार्ला ते मळवली दरम्यानच्या इंद्रायणी नदीवरील पुलाजवळील पर्यायी रस्ता पाण्याखाली गेला आहे.

कार्ला येथील इंद्रायणी पूल जीर्ण झाल्याने तो पाडून ऑक्टोबर महिन्यापासून नवीन पुलाच्या बांधकामास सुरुवात झाली. सध्या पुलाच्या कमानी उभारण्याचे काम सुरू आहे. मात्र, काम संथ गतीने चालू असल्याने ते अद्याप पूर्ण झालेले नाही.



### अनेक गावांचा संपर्क तुटणार

» मळवली भागातील अनेक विद्यार्थी कार्ल्याकडे तर कार्ला परिसरातील अनेक मुले लोकलने शिक्षणासाठी जात असतात. त्यामुळे, कार्ला परिसरातील या पुलावरून ये-जा करणाऱ्या अनेक गावांचा संपर्क तुटणार आहे. कामगार, शेतकरी, विद्यार्थी, दुग्ध व्यावसायिक या सर्वांना त्याचा त्रास सहन करावा लागणार आहे. विद्यार्थ्यांसह चाकरमान्यांचीही मोठी गैरसोय होणार आहे.

### तब्बल 25 गावांना फटका ?

» पुलाचे काम पूर्ण न झाल्याने कार्ला, भाजे, मळवली, देवळे, पाटण, बोरज, दहिवली, वेहेरगाव, शिलाटणे परिसरातील पंचवीस गावांना फटका बसण्याची चिन्हे आहेत. नागरिकांना जवळपास वीस किलोमीटरचा वळसा पडणार आहे. कार्ला, पाथरगाव, ताजे, बोरज मार्गे मळवली तसेच सदापूर व लोणावळा, औंढे, देवळे मार्गे भाजे असा जवळपास वीस ते पंचवीस किलोमीटरचा वळसा घालावा लागणार आहे. त्यात बोरज ते मळवली दरम्यान रस्त्याचे काम सुरू असल्याने रस्ता खोदून ठेवला असल्याने नागरिकांना दुहेरी फटका बसणार आहे.

# गट विकास अधिकारी पूर्णवेळ नसल्याने नागरिकांचे हाल

## मुळशी तालुक्याचा गटविकास अधिकारी म्हणून पदभार सोपवावा अशी मागणी मुळशी तालुक्यात जोर धरू लागली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

मुळशी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांच्याकडे मुळशीचा पूर्णवेळ तर मावळचा अतिरिक्त पदभार आहे. मुळशी आणि मावळ दोन्ही तालुके मोठे असून त्यांना फक्त मुळशी तालुक्याचा गटविकास अधिकारी म्हणून पदभार सोपवावा, अशी मागणी मुळशी तालुक्यात जोर धरू लागली आहे.

एक वर्षापूर्वी मुळशीतून गटविकास अधिकारी संदीप जठार यांची बदली झाली. तेव्हा सहाय्यक गटविकास अधिकारी संजय ढमाळ यांनी गटविकास अधिकारी म्हणून काही दिवस अतिरिक्त पदभार संभाळला.तालुक्यातील नागरिकांसाठी विविध शासकीय योजना असतात. त्याचा लाभ नागरिकांना घेता येत नाही.

तसेच जिल्हा परिषद अंतर्गत विविध विकास कामे येत असतात, ते सर्व प्रलंबित राहत आहे. पूर्ण वेळ गटविकास अधिकारी नसल्याने मुळशी पंचायत समितीचा कारभार नीट हाताळला जात नाही.



### मुळशी,मावळला सहाय्यक पद रिक्तच...

» पंचायत समिती मुळशी व पंचायत समिती मावळ या दोन्ही ठिकाणी सहाय्यक गटविकास अधिकारी हे पद रिक्त आहे. त्यामूळे या दोन्ही कार्यालयाचे कामकाज करताना अडचणी निर्माण होत असून दोन्ही तालुक्यांकडील पदाधिकारी यांना वेळ देता येत नाही. तरी माझेकडील गट विकास अधिकारी, पंचायत समिती मावळ या पदाचा अतिरिक्त पदभार कमी करावा, अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांच्याकडे गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनीच केलेली आहे.

अडीच वर्षे झाली तरी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूका राजकीय उदासीनतेमुळे झालेल्या नाहीत. प्रशासकच पंचायत समितीचा कारभार सांभाळत आहेत. त्यात अनेक नागरिकांना विविध गोष्टींपासून मुकावे लागत आहे. त्याखालील सरकारी कर्मचाऱ्यांचीही मनमानी कारभार करत आहेत. प्रशासनात सुसूत्रता नसल्या कारणाने सर्वसामान्यांचे मात्र हाल होत आहेत.

मुळशीत गटविकास अधिकारी पूर्ण वेळ नसल्याने ग्रामसेवक तसेच पंचायत समितीतील कर्मचारी यांच्यावर कोणाचाही वचक नसून ते मनमानी कारभार करत आहेत. तरी मुळशीला पूर्णवेळ गटविकास अधिकारी मिळावा, अशी मागणी जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांच्याकडे शिवसेना महिला आघाडीच्या सहसंपर्कप्रमुख स्वाती ढमाले यांनी केली आहे.

स्वराज्य संघटनेकडून यासाठी वेळोवेळी आंदोलनेही झाली. मात्र, प्रशासनाकडून मुळशीकरांच्या तोंडाला नेहमी पाने पुसण्याचेच उद्योग केले जातात, अशी खरमरीत टीका स्वराज्य संघटनेचे पुणे जिल्हा निमंत्रक राजू फाले यांनी केली आहे.

### गेली अडीच वर्षे होते प्रशासक राज

» गेली अडीच वर्षे मुळशी तालुक्यात प्रशासक राज आहे. त्यात गेले एक वर्ष अतिरिक्त गटविकास अधिकारी मुळशीचा कारभार बघत आहेत. जानेवारीत मुळशीला गटविकास अधिकारी मिळाले. मात्र, त्यांच्याकडे मावळचाही पदभार ठेवला. स्वराज्य संघटनेकडून यासाठी वेळोवेळी आंदोलनेही झाली. मात्र, प्रशासनाकडून मुळशीकरांच्या तोंडाला नेहमी पाने पुसण्याचेच उद्योग केले जातात, अशी खरमरीत टीका स्वराज्य संघटनेचे पुणे जिल्हा निमंत्रक राजू फाले यांनी केली आहे.

# शिरूरची तालुक्यातील 72 गावांचा बिबट प्रवणक्षेत्रात समावेश

## जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची माहिती : 233 अतिसंवेदनशील गावांना संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र म्हणून घोषित केले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील अनेक ठिकाणी बिबट्यांचा वावर वाढू लागला असताना अनेक दुर्घटना देखील समोर येत आहेत. जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पुणे जिल्ह्यातील २३३ अतिसंवेदनशील गावांना संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र म्हणून घोषित केले आहेत.

यामध्ये शिरुर तालुक्यातील ७२ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. दरम्यान, शिरूर तालुक्यातील बिबट प्रवण क्षेत्रांची संख्या लक्षणीय आहे.

शिरुर तालुक्यासह पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड तालुक्यात सात वनपरिक्षेत्र कार्यालय असलेल्या गावांमध्ये शेतीचे क्षेत्र मोठे असल्याने येथे पाण्यासाठी असलेल्या नद्या तसेच चासकमान कालवे यामुळे शेती मोठ्या प्रमाणात आहे.ऊस, डाळिंब, मका यांसह आदी पिकांची शेती तसेच डोंगर आदींमुळे बिबट्याला मुबलक वातावरण तसेच भक्ष्य मिळत असल्याने बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढू लागलेला आहे. कित्येक ठिकाणी बिबट्याने नागरिकांसह जनावरांवर हल्ले केल्याने काही दुर्घटना घडून नागरिकांचा जीव सुद्धा गेलेला आहे.



काही दिवसांपासून काही तालुक्यांमध्ये बिबट्यांच्या हल्ल्यांच्या घटना झपाट्याने वाढत असल्याने जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पुणे जिल्ह्यातील शिरुर, जुन्नर, आंबेगाव, खेड या तालुक्यांतील २३३ गावे संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र म्हणून घोषित केले आहे.

शिरुर तालुक्यातील ७२ गावांचा समावेश केला आहे. चार महिन्यांत दोनजण गंभीर जखमी तर चौघांचा मृत्यू झाला आहे. पाच वर्षात चाळीस जण गंभीर जखमी होऊन सोळा जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पुढील काळात नागरिकांनी काळजी घेण्याची गरज आहे. शिरुर तालुक्यातील सर्व बिबट प्रवण क्षेत्रात वनविभागाच्या माध्यमातून मानव व बिबट संघर्ष कमी करण्याबाबत जनजागृती मोहीम सुरु केली असून विशेष उपाययोजना करण्यात येत असल्याचे शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांनी सांगितले.

### शिरुरची घोषित गावे

» अण्णापूर, अरणगाव, आपटी, आलेगाव पागा, इनामगाव, करंदी, कुरुळी, गणेगाव दुमाला, गुणाट, पिंपरखेड, चांडोह, चिंचणी, जांबूत, जातेगाव खुर्द, टाकळी हाजी, तांदळी, निमगाव म्हाळुंगी, निमोणे, न्हावरा, पिंपळसुटी, फाकटे, बाभुळसर बुद्रुक, मांडवगण फराटा, म्हसे बुद्रुक, रांजणगांव सांडस, रासाई, वडनेर खुर्द, वढु बुद्रुक, शरदवाडी, शिरुर ग्रामीण, सादलगांव, शिवतक्रार म्हाळुंगी, टाकळी भीमा, कोरेगाव भीमा,काठापुर खुर्द, आमदाबाद, आंधळगाव, आंबळे, उरळगाव, करंजावणे, कर्डेलवाडी, कवठे येमाई, कोंढापुरी, कोळगाव, डोळस, गणेगाव खालसा, जातेगाव बुद्रुक, डोंगरगण, तळेगाव ढमढेरे, दहिवडी, धामारी, निमगाव दुडे, निमगाव भोगी, निर्वी, पारोडी, बाभुळसर खुर्द, बुरंजवाडी, भांबर्डे, मलठण, दरेकरवाडी, माळवाडी, मुखई, वरुडे, वाघाळे, विठ्ठलवाडी, शिंदोडी, शिरसगाव काटा, सविंदणे, सणसवाडी, धानोरे, नागरगाव, डिग्रजवाडी ही गावे बिबट प्रवण क्षेत्र म्हणून घोषित केले आहे.